Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

**Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed**

**Multidisciplinary International Research Journal**

**January-2023**

**(CCCLXXXVI ) 386 (B)**

## 75th YEARS OF INDIAN INDEPENDENCE




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
Dr. Vilas Aghav
Officiating Principal
Associate Professor & Head
Department of Political Science.
Adarsh Mahavidyalaya, Hingoli Dist. Hingoli

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

January-2023

(CCCLXXXVI ) 386 (B)

## 75th YEARS OF INDIAN INDEPENDENCE

YEARS
OF INDEPENDENCE

**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
Dr. Vilas Aghav
Officiating Principal
Associate Professor & Head
Department of Political Science.
Adarsh Mahavidyalaya, Hingoli Dist. Hingoli

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com

Impact Factor – 8.575
ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refereed Indexed
### Multidisciplinary International Research Journal

## January -2023

ISSUE No - (CCCLXXXVI ) 386 -B

**75th YEARS OF INDIAN INDEPENDENCE**

Late ... Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development
Training Institute, Amravati.

**Dr. Vilas Aghav**
Editors ,
Officiating Principal,
Associate Professor & Head
Department of Political Science.
Adarsh Mahavidyalaya, Hingoli Dist. Hingoli

**Aadhar International Publication**
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

| | | |
|---|---|---|
| 20 | भारतीय संविधानातील मानवी हक्क : एक ऐतिहासिक अवलोकन<br>राजाराम रा पिंपळपल्ले | 89 |
| 21 | मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना<br>निरंजन केशवराव पतंगे , प्रा.डॉ.व्ही.आय.पाटील | 93 |
| 22 | दहशतवाद : लोकशाहीपुढील एक आव्हान<br>प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे , डॉ. महादेव गव्हाणे | 98 |
| 23 | भारतीय संघराज्याचे स्वरूप प्रा.पडोळे कोंडिबा रमेशराव | 101 |
| 24 | मानवीहक्काच्या संरक्षणाची उपयोगिता आणि आवश्यकता डॉ. विलास सोमाजी पवार | 104 |
| 25 | भारतातील संसदीय लोकशाही प्रणाली डॉ. घन आनंद लक्ष्मीकांत | 108 |
| 26 | मूलभूत अधिकाराची भूमिका प्रा.डॉ.धुमाळे धोंडीराम कामाजी | 113 |
| 27 | ओबीसी राजकीय आरक्षण प्रा.डॉ.आंधळे बी.व्ही. | 116 |
| 28 | मुस्लिमांचा विकास : भ्रम आणि वास्तव पठाण मगबूलखान इस्माईलखान | 119 |
| 29 | स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षी - मुलींच्या शिक्षणातील प्रमुख समस्या बालविवाह !!<br>प्रा. डॉ. रंजीता डी.जाधव | 128 |
| 30 | ग्रामगीतेतील ग्राम प्रशासन आणि प्रासंगिकता डॉ. महेश्वर मंगनाळे | 133 |
| 31 | भारतीय संविधानातील स्त्रियांचे अधिकार आणि वास्तव : एक अभ्यास<br>दलित सुभाषराव कांबळे , प्रा. डॉ. दीपक धारवाडकर | 136 |
| 32 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रवादातील योगदान डॉ.मोगले राजेश दत्तात्रय | 141 |
| 33 | भारताचे बदलते परराष्ट्र धोरण डॉ. विद्या देविदास मालवणकर | 144 |
| 34 | भारतीय लोकशाहीतील मताधिकार आणि मतदाराचे वर्तन डॉ.सुखनंदन ढाले | 147 |
| 35 | भारतीय संविधानातील जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्याचा अधिकार - एक विश्लेषण<br>प्रा. विजय रा. ढेंगळे | 152 |
| 36 | भारतीय संविधानाची काव्यात्म नाळ: 'संविधानाच्या स्वप्नातलं गाव<br>डॉ.सुरेश भिमराव लेकुळे | 156 |
| 37 | भारतीय संविधानाची उपलब्धी डॉ. माधव कदम | 160 |
| 38 | भारतीय राज्यघटना निर्मीतीत दुर्गाबाई देशमुख यांचे योगदान<br>प्रा. विश्वघजीत हणमंतराव जाधव | 162 |
| 39 | ग्रामीण विकास विषयक अण्णा हजारे यांच्या विचारांचा आढावा<br>डॉ. आकाश शेपराव वांगर | 164 |

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, (CCCLXXXVI) 386- B
ISSN : 2278-9308 January, 2023

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# ओबीसी राजकीय आरक्षण

प्रा.डॉ.आंधळे बी.व्ही.

राज्यशास्त्र विभाग कै.रमेशवरपुडकर महाविद्यालय सोनपेठ जि.परभणी ,मोब.८८३००६६३५५

**प्रस्तावना**:-सन १९९० च्या दशकानंतर भारतीय राजकारणात तीन यांचा बोलबाला राहिला आहे यामध्ये मंदिर मज्जित आणि मंडल आयोग हे होत मंडल आयोगाने इतर मागास वर्गातील (Other Backward classes-OBC) समाज घटकांना राजकीय शैक्षणिक व नोकरी आरक्षण दिले तत्पूर्वी भारतीय राज्यघटनेच्या कलम ३३४ नुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना आरक्षणाची सुविधा देण्यात आली होती परंतु १९८९ मध्ये पंतप्रधान व्ही.पी. सिंग यांनी मंडल आयोगाच्या शिफारशी स्वीकारून इतर मागास वर्ग यांना राजकीय व शैक्षणिक आणि नोकरीतील आरक्षण देण्याचा निर्णय घेतला. याची अंमलबजावणी १९९२ पासून करण्यात आली.

१९९४ महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ मध्ये दुरुस्ती करून कलम १२(२) नुसार इतर मागासवर्गीयांना (OBC) २७% आरक्षण देण्यात आले. म्हणजेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत २७% उमेदवार इतर मागासवर्गीय घटकांमधून निवडून देणे बंधनकारक करण्यात आले. परंतु राजकीय आरक्षणामध्ये दर दहा वर्षाला पुनर्र आढावा घेण्याची तरतूद आहे. त्यासाठी सर्वोच्च न्यायालय तीन अटी घातल्या आहेत. यात एक म्हणजे स्वतंत्र आयोग स्थापन करून सद्यकालीन परिस्थितीचा आढावा घेणे. दोन म्हणजे आरक्षणाची अति व्याप्ती होऊ नये म्हणून सदर आयोगाच्या शिफारशीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण ठरवणे. आणि तिसरे म्हणजे कोणत्याही परिस्थितीत एससी, एसटी आणि ओबीसी चे एकूण आरक्षण ५०% पेक्षा अधिक होता कामा नये.

एससी, एसटी प्रवर्गाला देण्यात आलेले आरक्षण हे घटनात्मक(Constitutional)आहे. तर ओबीसी प्रवर्गाला देण्यात आलेले आरक्षण वैधानिक (Leagal)आहे. वैधानिक आरक्षण म्हणजे राज्याच्या कायदेमंडळाने कायद्याद्वारे देण्यात आलेले आरक्षण होय. त्यामुळे हे आरक्षण वेळोवेळी प्रस्थापित करणे आवश्यक आहे.

**आरक्षणाचाइतिहास** :- १८८२ मध्ये महात्मा फुले यांनी हंटर कमिशन पुढे साक्ष देताना मोफत शिक्षण व ब्रिटिश सरकारमध्ये भारतीयांना नोकरीचे आरक्षण द्यावे अशी मागणी केली होती. यानंतर १८९१ मध्ये त्रावणकोर राज्यात पात्र मूळ रहिवाशांना सार्वजनिक सेवेत घ्यावे यासाठी निदर्शने करण्यात आली. पुढे १९०१ मध्ये राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानांमध्ये आरक्षण धोरण लागू केले.आणिवेगवेगळयामागासजातीजमातींनाआरक्षणदिले.

तसेच १९०८ मध्ये ब्रिटिश सरकारने अनेक जाती व समुदायांना आरक्षण देण्याचा निर्णय घेतला.सन१९०१ आणि १९१९च्या ब्रिटिशांनी कायद्यामध्ये भारत सरकारच्या विविध प्रांत सरकारामध्ये आरक्षणाची तरतूद करण्यात आली.१९२१ च्या मद्रास प्रेसिडेन्सीने जात आधारित आरक्षण आदेश जारी करून ब्राह्मणेतरांसाठी ४४%, ब्राह्मणांना १६%, मुस्लिमांना १६%,□ग्लो इंडियन यांना १६%, अनुसूचित जातीसाठी ८% आरक्षण देण्याचा निर्णय घेतला . सन १९४२ मध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी सरकारी नोकरी व शिक्षणात अनुसूचित जातींना आरक्षणाची मागणी केली.आणि सन१९४६ च्या कॅबिनेट मिशनने अनुपातीक प्रतिनिधित्व प्रस्तावित केले.

स्वातंत्र्यानंतरभारतीय संविधानात सर्व नागरिकांना समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी अनुसूचित जाती जमाती व सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास समाजाला आरक्षण देण्याच्या तरतुदी करण्यात आल्या. त्यानुसार या सर्व घटकांना आरक्षण देण्यात आले आहे.१९५३ मध्ये काकासाहेब कालेलकर आयोग स्थापन करून इतर मागासवर्गीय यांना शैक्षणिक व नोकरीमध्ये आरक्षण देण्या संबंधीच्या शिफारशी करण्यात आल्या. पणइतर मागासवर्गीय घटकांना देण्यात आलेल्या आरक्षणाची तरतूद नेहरू सरकारने फेटाळली. यानंतर १९७९मध्ये बी.पी. मंडल आयोगाची स्थापना करण्यात आली.१९८० मध्ये मंडल आयोगाने आपला अहवाल सादर करत इतर मागासवर्गास आरक्षण देण्याची शिफारस केली.

सदरील आयोगाच्या शिफारशी प्रत्यक्षात आणण्यासाठी १९९० मध्ये पंतप्रधान व्ही.पी.सिंग यांनी मंडल आयोगाची अंमलबजावणी करून इतर मागासवर्गीय घटकांना २७% आरक्षण देण्याचा निर्णय घेतला. पण दिल्ली विद्यापीठात राजीव गोस्वामी या विद्यार्थ्याने आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला.तेव्हा हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. त्यानंतर १९९२ मध्ये इंद्रा सहानी आणि के.कृष्णमुर्ती प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने इतर मागासवर्गीय घटकांना

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, (CCCLXXXVI) 386- B
ISSN : 2278-9308
January, 2023

आरक्षण देण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. आणि तेव्हापासून भारतात इतर मागासवर्गीय घटकांना शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रामध्ये २७% आरक्षण असलेले दिसून येते.

**ओबीसी राजकीय आरक्षणाचा घटनाक्रम:-** १९९४ मध्ये महाराष्ट्र सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसींना राजकीय आरक्षण देण्याचा निर्णय घेतला. यानुसार महाराष्ट्रामध्ये एससी, एसटी आणि ओबीसी २७% असे एकूण ५०% आरक्षण देण्यात आले.१९३१ च्या जातनिहाय जनगणनेनुसार ओबीसींची लोकसंख्या ५२ टक्के आहे. या संख्येच्या ५०% म्हणजे २७ टक्के आरक्षण १९९४ मध्ये देण्यात आले.१९३१ नंतर जातनिहाय जनगणना झाली नाही. पण या २०११ च्या जनगणनेत ओबीसींची जात निहाय जनगणना करण्याची मागणी विहित स्तरात करण्यात आली. त्यानुसार जनगणना करण्यात आली. पण यामध्ये अनेक त्रुटी व दोष राहिले. त्यामुळे ही माहिती अधिकृत स्वीकारली नाही. म्हणून केंद्र सरकारने २०१८ मध्ये सन २०२१ च्या जनगणनेत ओबीसीची जात निहाय जनगणना करण्याची घोषणा करण्यात आली. परंतु सन १९२१ मध्ये संपूर्ण जगभर कोरोना महामारीचे संकट उभे राहिले. त्यामुळे सन २०२१ ची जनगणना होऊ शकली नाही. दरम्यानच्या काळात विकास गवळी यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठापुढे २०१८ मध्ये एक याचिका दाखल केली. यात महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एकूण आरक्षण ५०% पेक्षा अधिक असल्याचे म्हटले. वास्तविक ५०% पेक्षा अधिक आरक्षण देता येणार नाही. असे सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा सहानी आणि ए. कृष्णमूर्ती प्रकरणाच्या निकालात स्पष्ट केले आहे. त्यामुळे नागपूर खंडपीठातील हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने ओबीसींचे हे आरक्षण ट्रिपल टेस्ट (Tripal Test) च्या आधारावर देण्यात यावे. अशा सूचना १३/१२/२०१९ मध्ये दिल्या. महाराष्ट्र सरकारने ट्रिपल टेस्ट पूर्ण न करता वटहुकूम काढून वेळ मारून नेला. दरम्यानच्या काळात राज्यात सत्तांतर होऊन महाविकास आघाडीचे सरकार आले.तेव्हाजातीनिहायजनगणनेचा इंपेरिकलडेटा (Imperical deta)केंद्रानेद्यावा अशी मागणी करण्यात आली.

**राजकीय पक्षांची भूमिका :-** ओबीसी प्रवर्गातीलसामाजिकघटकांना राजकीय आरक्षण देण्यासंबंधी महाराष्ट्रातील जवळपास सर्वच राजकीय पक्ष आग्रही आहेत.जोपर्यंतओबीसी प्रवर्गातील सामाजिक घटकांना राजकीय आरक्षण मिळत नाही तोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाच नको अशी भूमिका भारतीय जनता पार्टी, अखिल भारतीय काँग्रेस पक्ष,राष्ट्रवादीकॉंग्रेस पक्ष, शिवसेना, मनसे, वंचित बहुजन आघाडी या सारख्या विविध पक्षांनी घेतली आहे.

याशिवाय काही राजकीय पक्षांनी जर ओबीसींना आरक्षण घटनेच्या चौकटीत राहून आरक्षण देता आले नाही तर आपला पक्ष तिकीट वाटपात २७% कोटा ओबीसी प्रवर्गातील लोकांसाठी देईल अशी भूमिका घेतली आहे.देवेंद्रफडणवीस, अजित पवार, उध्दव ठाकरे,राज ठाकरे, पंकजा मुंडे, छगन भुजबळ ही सर्वराजकीयपक्षांची नेतेमंडळीओबीसी प्रवर्गातीलराजकीयआरक्षणाबाबतआग्रही आहेत.

**समारोप :-** सध्यासंपूर्णदेशातीलविविधराज्यांमध्येस्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ओबीसी प्रवर्गातीलआरक्षणाचा मुद्दाकळीचावनला आहे.महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशयांसारख्यामोठ्याराज्यातओबीसी प्रवर्गातीललोकांची जणगनणाकरूनत्यांनाराजकीयक्षेत्रातआरक्षणदेण्यासंबंधीपावले उचललीजात आहेत.परंतुओबीसींचीखरीलोकसंख्याकितीहेनिश्चितनाही.त्यामुळेओबीसींचीजनगणनाकरण्यातयावी अशी मागणी केली जात आहे.

महाराष्ट्र सरकारने ओबीसी प्रवर्गातील घटकांना राजकीय आरक्षण देण्यासंबंधी बांठिया आयोग नेमला होता.महाराष्ट्राचेमुख्य सचिव जयंतकुमार बांठिया यांच्या अध्यक्षतेखालील या आयोगाने ओबीसी प्रवर्गातील घटकांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये २७%आरक्षणाचीसिफारस केली.यानुसारमहाराष्ट्रामध्ये ओबीसींना महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांच्या मध्ये प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळेल.महाराष्ट्रातील३४जिल्हा परिषदेपैकी ७जिल्हा परिषद अध्यक्ष,३५१पंचायत समित्यांचे ८१ सभापती,२७८३१ग्रामपंचायतचमधील १०३०.७७ सरपंच पद ओबीसी प्रवर्गातील घटकांना मिळतील.तर२७महापालिकांपैकी ७महापौर २४१नगरपालिकांतील ६६नगराध्यक्ष तर १२८नगरपंचायतमधील ३७अध्यक्ष हे ओबीसी प्रवर्गातील घटकांना आरक्षित राहतील.

ओबीसी प्रवर्गातील घटकांनाराजकीय आरक्षणदिलेनाही तरयेणाऱ्या काळातत्याचे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकअशासर्वक्षेत्रावरदुरगामीपरिणामहोतील.अगोदरचमहाराष्ट्रातओबीसी राजकीयनेतृत्वडावलले जात आहे.म्हणुनसर्वसामान्यओबीसीसमुदायामध्ये रोशआहे.त्यातस्थानिक स्वराज्य संस्थांमध्येराजकीय आरक्षणनाकारलेतरओबीसीनेतृत्वपुढेयेणार नाही.

संदर्भ सुची :-

१) www.vikeapida.com
२) www.maharashtratimes.com
३) www.bbc.com
४) Mandal commission report -
५) भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास –मदनमार्डीकर
६) भारतीय शासन आणि राजकारण –भा.ल.भोळे
७) आरक्षणाची वाटचाल आणि ओबीसी आरक्षण –डॉ रविंद्र भगणे
८) अक्षरनामा – ओबीसी राजकीय आरक्षणाचा प्रश्न वस्तुस्थिती आणि विपर्यास – डॉ .व्ही.एल.एरंडे

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani